# ऑपरेशन बरगा!

या देशात मूळ संघर्ष हा जमिनीचा आहे, हे कम्युनिस्टांना माहीत होते. त्यामुळे सत्तेत येताच प.बंगाल सरकारने आधी जमीन सुधारणेचा कार्यक्रम हाती घेतला. कसेल त्याची जमीन ही घोषणा देऊन सशस्त्र संघर्ष करणाऱ्या नक्षलवादी उठावाने पोळलेल्या ज्योती बसु सरकारने कसेल त्याची जमीन हा कार्यक्रम जोमाने राबवला. एवढी वर्षे बंगालमध्ये सीपीएम सत्तेवर आहे याचे मुख्य कारण हे त्यांनी केलेल्या जमीन सुधारणेला दिले पाहिजे, यावर तज्ज्ञांचे दुमत नाही.

देश स्वतंत्र झाल्यानंतरही या देशात जमीनदारी पद्धत मोठ्या प्रमाणावर सुरूच होती. जमीन सुधारणेचे काही कायदे केंद्र सरकारने केले होते. मात्र ते कागदावरच होते. प.बंगालमध्ये पूर्ण बहुमताने सत्तेवर येताच ज्योती बसु यांनी जमीन वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला. याला ऑपरेशन बरगा असे नाव देण्यात आले. ऑपरेशन बरगाने देशात एक वेगळीच क्रांती केली.

हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने राबवण्यात आला. काही वर्षांतच सुमारे ३० लाखाहून अधिक भूमिहिनांना जमीन वाटप करण्यात आले होते. केवळ जमीन वाटप करून सरकार थांबले नाही तर ही जमीन भूमिहिनांना कसता येईल याची सरकारने काळजी घेतली. केवळ जमीन वाटप केले नाही तर काही विभागात पिकांचा हिस्सा मूळ मालक आणि कसणाऱ्यांना देण्यात येत होता. असे अनेक प्रयोग करण्यात आले. कोणत्याही राज्य सरकारने आतापर्यंत एवढ्या मोठया प्रमाणावर जमीनवाटप केलेले नाही.

ऑपरेशन बरगात ज्यांना जमीन मिळाली त्या शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज देण्यात आले. बियाणे, खते आणि शेतीची इतर साधने देण्यात आली. हा कार्यक्रमही मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आला. त्यामुळे भूमिहीन खऱ्या अर्थाने जमीनमालक बनले. भूमिहिनांना मालक करणारा सरकारचा हा निर्णय प.बंगालला देशात वेगळे स्थान देऊन जाणारा ठरला.

याशिवाय ज्योती बसू यांनी सत्तेत सर्वांना स्थान मिळेल याची काळजी घेतली. पंचायत राजची अंमलबजावणी प.बंगालमध्ये ८० च्या दशकातच करण्यात आली होती. यातही एक वेगळा सामाजिक प्रयोग सरकारने केला. पंचायतींमध्ये अलिखित आरक्षण ठेवण्यात आले. पंचायतींमध्ये ३५ टक्के महिला, ३० टक्के अनुसूचित जाती-जमाती आणि ८ टक्के मुस्लिम असतील, अशी व्यवस्था करण्यात आली. पंचायतींमध्ये किमान ७० टक्के सदस्य हे अल्पभूधारक असावेत, असाही निर्णय घेण्यात आला. राज्याच्या एकूण बजेटपैकी सुमारे ५० टक्के निधी पंचायतीच्या मार्फत खर्च करण्याचा कायदा राज्य सरकारने केला. ऑपरेशन बरगासोबत असे काही परिवर्तनकारी प्रयोग या सरकारने केले.

जमीन सुधारणा केल्यामुळे कम्युनिस्टांना एवढी वर्षे सत्तेवर राहता आले आणि आता शेतकऱ्यांच्या जमिनींना हात लावण्याचा त्यांनी प्रयत्न केल्यामुळेच त्यांच्या पायाखालची वाळू सरकत आहे.

बंधुराज लोणे
भ्र. ९८६९ ३८० ०८३
इमेल : bandhulone@gmail.com